# मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

( पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

MHBU210004592024

**नियमीत दिवाणी दावा क्र.१०१/२०२४**

रामकिसन सवाईराम राठोड

–विरुध्द–

जगदिश छोटुलाल सुपटयान व इतर

## अर्ज निशाणी क्र.३२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ब) सह वाचनीय कलम १५१ अनुसार दाखल करुन दावा खारीज करण्याची विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे लेखी म्हणणे देउन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविण्यात आला आहे.

३. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ब) सह वाचनीय कलम १५१ अनुसार खारीज होण्यास पात्र आहे काय ? | ... नकारार्थी |
| २) | कोणता आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

४. वादी व प्रतिवादी क्र.१ व २ चे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय यांनी मोजणी क्र.१६३५/हद्द कायम/नियमीत २०२३ दिनांक २७/०९/२०२३ अन्वये केलेली मोजणी तसेच तहसिलदार लोणार यांनी दिनांक

१३/०५/२०२४ व दिनांक ०६/०२/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेश रद्द होउन मिळण्याकरीता आणि निरंतर मनाई आदेश प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्याविरुध्द पारित होण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कथनानुसार त्यांनी त्यांच्या मालकीच्या जमीनी ज्या तिऱ्हाइत व्यक्तींना विक्री केलेल्या आहेत त्या खरीददारांना दाव्यात पक्षकार करण्यात आलेले नाही. वादपत्राचे अवलोकन केले असता वादींने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या जमीनी विक्री केल्याबाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी करुन दिलेले खरेदीखत रद्द होउन मिळण्याची विनंती केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार केल्याची बाधा येत आहे, असे दिसुन येत नाही. पुढे वादपत्रातील वादीने केलेल्या विनंतीचा विचार केला असता दाव्यास योग्य तो न्यायालयीन शुल्क जमा केल्याचे दिसुन येत आहे. सबब, वरील कायदेशीर बाबींचा विचार केला असता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ब) मधील तरतुदीनुसार दावा खारीज होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.३२ नामंजूर करण्यात आला.

२. खर्चाबाबत हुकूम नाही.

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.01.29 17:25:11 +0530

(अ. अ. शेख)

दिनांक :– २९/०१/२०२५. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Steno. Grade II | Balkrishna M. Shilwant. |
| Court | Civil Judge Senior Division, Mehkar. |
| Date | 29/01/2025 |
| Order signed by the presiding officer on | 29/01/2025 |
| Order uploaded on | 30/01/2025 |